**एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२०१७ (सीपीटीपी-४) अंतर्गत परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांना विविध विभागांतर्गत खातेनिहाय संलग्न प्रशिक्षण, जिल्हास्तरीय प्रशिक्षण व स्वतंत्र कार्यभार (एकूण ७५+४) आठवडयांच्या प्रशिक्षणासाठी जिल्हा वाटप करणेबाबत**

# महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन आदेश क्र.ससेनि-२०१७/प्र.क्र.१५७/ई-३

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ०४ जानेवारी,२०१८

**संदर्भ :**

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.टिआरएन-१११४/प्र.क्र.८३/१४/१८-ब, दि.३.११.२०१४
२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.टिआरएन-०८१४/प्र.क्र.६४/१४/१८-ब, दि.११.११.२०१४
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.टिआरएन-१११४/प्र.क्र.८४/१८-ब, दि.२२.४.२०१५
४. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.इएसटी-२०१७/प्र.क्र.१२४/ई-८ दि.०६.११.२०१७
५. सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र.टिआरएन-१२१७/प्र.क्र.७८/सीपीटीपी-अ दि.२७.१२.२०१७

**आदेश :-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त उपजिल्हाधिकारी व तहसीलदार (गट-अ) यांचे एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२०१७ (सीपीटीपी-४) अंतर्गत विविध विभागांतर्गत खातेनिहाय संलग्न प्रशिक्षण, जिल्हास्तरीय प्रशिक्षण व स्वतंत्र कार्यभार या ७५+४ आठवडयांचे प्रशिक्षण दि.०७.०१.२०१८ पासून सुरू होणार आहे. शासनाने निश्चित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमानुसार परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार (गट-अ) यांना प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे जिल्हा वाटप करण्यात येत आहे.

**उपजिल्हाधिकारी संवर्ग :-**

| अ.क्र. | परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांचे नांव | प्रशिक्षणासाठी वाटप करण्यात आलेला जिल्हा व विभाग | |
|---|---|---|---|
| | | जिल्हा | विभाग |
| १ | श्री.अभिजीत बा. नाईक | अमरावती | अमरावती |
| २ | श्री.अहिरे भूषण अशोक | यवतमाळ | अमरावती |
| ३ | श्री.गायकवाड श्रीकांत शाहू | नांदेड | औरंगाबाद |
| ४ | श्री.ढवळे सं. अच्युतराव | जालना | औरंगाबाद |
| ५ | श्री.भसके संदिप सदाशिव | बुलडाणा | अमरावती |
| ६ | श्रीम. बाफना निलम भारत | औरंगाबाद | औरंगाबाद |

## तहसीलदार संवर्ग :-

| अ.क्र. | परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांचे नांव | प्रशिक्षणासाठी वाटप करण्यात आलेला जिल्हा व विभाग | |
|---|---|---|---|
| | | जिल्हा | विभाग |
| १ | श्रीम. प्रियांका मधुकर ढोले | पुणे | पुणे |
| २ | श्री. जाधव अभिजीत राजाराम | जळगाव | नाशिक |
| ३ | श्री.पवार प्रदीपकुमार रावसाहेब | नंदुरबार | नाशिक |
| ४ | श्री. पवार महेश कौतीकराव | बुलडाणा | अमरावती |
| ५ | श्रीमती रोहिणी दत्तात्रय नऱ्हे | अहमदनगर | नाशिक |
| ६ | श्री. पाठक अमोल भागचंद | वर्धा | नागपूर |
| ७ | श्री. निले श्रीकांत रामचंद्र | वाशिम | अमरावती |
| ८ | श्री. वाकडे गोविंद पेत्रास | सांगली | पुणे |
| ९ | श्री.खाडे सचिन बाळासो | यवतमाळ | अमरावती |
| १० | श्रीमती जाधव मृणाल प्रकाश | नांदेड | औरंगाबाद |
| ११ | श्रीमती सुळे प्रिया तानाजी | उस्मानाबाद | औरंगाबाद |
| १२ | श्रीम. देशमुख भाग्यश्री अविनाश | जालना | औरंगाबाद |
| १३ | श्रीमती सावंत चैताली भास्कर | कोल्हापूर | पुणे |
| १४ | श्री. मोरे सिध्दार्थकुमार जगन्नाथ | भंडारा | नागपूर |
| १५ | श्री. बिरादार संजय पुंडलीकराव | चंद्रपूर | नागपूर |
| १६ | श्री. पाटील परिक्षित पांडुरंग | रत्नागिरी | कोकण |
| १७ | श्री.ओंकार शेखर ओतारी | सिंधुदुर्ग | कोकण |
| १८ | श्रीमती निलीमा सुरेश रंगारी | नागपूर | नागपूर |
| १९ | श्रीमती प्राजक्ता शांताराम घोरपडे | रायगड | कोकण |

उपरोक्त परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी ७५+४ आठवडयांचे विभागीय प्रशिक्षण पूर्ण करण्यासंदर्भातील सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना खालीलप्रमाणे आहेत :-

१. उपरोक्त परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांना ७५+४ आठवडयांचे विविध विभागांतर्गत खातेनिहाय संलग्न प्रशिक्षण, जिल्हास्तरीय प्रशिक्षण व स्वतंत्र कार्यभार प्रशिक्षण कार्यक्रमासंदर्भात पुस्तिका प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांचा दि. ०७.०१.२०१८ पासून प्रशिक्षण कार्यक्रम तात्काळ तयार करावा व त्याची प्रत परिवीक्षाधीन तहसीलदार यांना उपलब्ध करुन द्यावी.

२. परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी दैनंदिन रोजनिशी दररोज न चुकता ई-मेलद्वारे संबंधित जिल्हयातील जिल्हाधिकारी व संपर्क / समन्वय अधिकारी, उपायुक्त (महसूल) यांना सादर करावी.

३. परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांना संलग्न करण्यात आलेल्या कार्यालयाची रचना व कार्य याबाबत झालेल्या ज्ञानाची पडताळणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी दर १५ दिवसांनी मूल्यांकन चाचण्या घ्याव्यात व त्याचे निष्कर्ष संपर्क समन्वय अधिकारी, उपायुक्त (महसूल) यांच्याकडे उपलब्ध करुन द्यावेत.

४. परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्या दैनंदिन उपस्थिती / अनुपस्थिती / वर्तन इ. बाबत संबंधित जिल्हयातील जिल्हाधिकारी यांनी संपर्क/ समन्वय अधिकारी, उपायुक्त (महसूल) यांना अहवाल सादर करावा.

५. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थीने गैरवर्तन केल्याचे अथवा प्रशिक्षण पुरेशा गांभीर्याने घेत नसल्याचे निदर्शनास आल्यास अशा घटना त्वरीत संबंधित जिल्हाधिकारी यांनी संपर्क समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांच्याशी संपर्क साधून निदर्शनास आणून देण्यात याव्यात. तसेच गैरवर्तनाची नोंद संबंधितांच्या वैयक्तिक सेवा अभिलेखात नोंदवाव्यात. तसेच या संबंधित अहवाल समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांनी शासनाच्या महसूल व वन विभाग व सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.

६. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.ईएसटी-२०१७/प्र.क्र.१२४/ई-८ दि.०६.११.२०१७ मधील परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केल्यानुसार, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांना दि.१.८.२०१७ ते दि.५.११.२०१७ या कालावधीतील १४ आठवडयांचे प्रशिक्षण व दि.६.११.२०१७ ते दि.२९.१२.२०१७ या कालावधीतील तांत्रिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर या उमेदवारांना दि.३०.१२.२०१७ ते दि.३१.७.२०१९ या प्रशिक्षण पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीतील नियमित वेतन दि.१.८.२०१७ ते दि.२९.१२.२०१७ या कालावधीत अदा करण्यात आलेली ठोक वेतनाची रक्कम आणि प्रत्यक्ष वेतन यामधील फरकाची रक्कम (एक रक्कमी) सदरहू परिवीक्षाधीन उमेदवार खातेनिहाय संलग्न प्रशिक्षण जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी जिल्ह्यांकडे रुजू झाल्यानंतर संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने अदा करण्याची कार्यवाही करावी.

७. ७५+४ आठवडयांच्या कालावधीत परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांची किमान २ विभागीय परीक्षा घेणे अपेक्षित आहे. त्यासाठी संबंधित विभागीय आयुक्तांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि शासन यांच्याशी समन्वय साधून वेळापत्रक निश्चित करावे.

८. परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी विभागीय संलग्नतेच्या ७५+४ आठवडयांच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.टीआरएन-०८१४/ प्र.क्र.६४/ १४/१८-ब, दि.११.११.२०१४ अन्वये निर्गमित केलेल्या मागदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

९. ७५+४ आठवडयातील विभागीय प्रशिक्षणच्या टप्प्यामध्ये परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांचे मुल्यमापन करण्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.टीआरएन-१११४/प्र.क्र.८४/१८-ब दि.२२.४.२०१५ मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी संपर्क/समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांची राहील.

१०. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.१३.११.२०१७ मधील तरतुदींनुसार एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेणा-या परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांच्या रजा मंजूर करताना त्यातील सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे, अन्यथा रजा मंजूर करणारे प्राधिकारी कारवाईस पात्र ठरतील याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

११. शासन या आदेशान्वये विभागातील संपर्क/समन्वय अधिकारी म्हणून उपायुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, यांना घोषित करीत आहे. त्यानुसार संपर्क/समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांनी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी योग्य ती दक्षता घ्यावी.

१२. परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांना केवळ विभागीय संलग्नतेच्या ७५+४ आठवडयांच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठीच जिल्हा वाटप करण्यात येत आहे.

१३. सदर प्रशिक्षण परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार विभागीय संलग्नतेच्या ७५+४ आठवडयांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता महससंचालक, यशदा, पुणे यांनी कार्यमुक्त करावे.

१४. परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी त्यांना प्रक्षिणासाठी वाटप केलेल्या जिल्हयात दि.०७.०९.२०१८ पर्यंत रुजू व्हावे व तसा अनुपालन अहवाल महासंचालक, यशदा, पुणे व शासनास तात्काळ सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(मा.आ. गुट्टे)
शासनाचे सह सचिव

प्रति,

१. अप्पर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२
२. महासंचालक, यशदा, पुणे
३. सर्व विभागीय आयुक्त
४. सर्व जिल्हाधिकारी
५. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (*पत्राने)
६. उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग (सीपीटीपी-अ), मंत्रालय, मुंबई
७. संबंधित प्रशिक्षणार्थी (महासंचालक, यशदा, पुणे यांचेमार्फत)
८. अवर सचिव ई-२ व ई-८ कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. कार्यासन ई-३ निवड नस्ती, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई